# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सिद्दाप्पा मल्लाप्पा तेली ,<br>रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u>** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सिद्दाप्पा मल्लाप्पा तेली , रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली यांनी बंद पडलेले रोहित्र बदलून मिळणेबाबतचा अर्ज दि. ३.५.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे केला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ४८ तासांत रोहित्र बदलून न दिल्यामुळे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

सांगली कक्षाने दि. ४.५.२०१० रोजी एस.ओ.पी. प्रमाणे रोहित्र बदलण्याचे आदेश कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांना दिले. परंतु तक्रारदाराचे समाधान न झाल्यामुळे दि. १०.५२०१० रोजी मंचाकडे फॅक्सद्वारे ' अ ' फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली व नुकसान भरपाईची मागणी केली.

वितरण कंपनीने दि. ४.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचे शेतातील रोहित्र दि. २९.४.२०१० रोजी जळाले असून त्या ठिकाणी दुसरे रोहित्र दि. ११.५.२०१० रोजी बसविल्याचे नमूद केले आहे. कवठे महांकाळ विभागातील जळालेल्या रोहित्रांची संख्या जास्त असल्यामुळे विहित मुदतीत रोहित्र बदलता न आल्याचे मान्य केले आहे व एस.ओ.पी. लागू न करण्याची विनंती करण्यात आली आहे.

प्रस्तुत तक्रार मंचाकडे सुनावणीसाठी दि. ९.६.२०१० रोजी ठेवली असतां, तक्रारदार हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियांता, कवठे महांकाळ विभाग, श्री. राठोड, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग हे हजर होते. त्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले आहे. तथापि वि.प.तर्फे तक्रारदाराने नुकसान भरपाई नको असल्याचे पत्र मंचापुढे सादर केले, त्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार निकाली कढण्यात येत आहे.

२) भरपाईबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :